## Year 2022-23

# शासकीय तंत्रनिकेतन, एमसीईडीत उद्योजकता वाढीसाठी करार

प्रतिनिधी | जळगाव

शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव व महाराष्ट्र सेंटर फॉर आंत्रप्रेनेरशिप डेव्हलपमेंट (एमसीईडी) यांच्यात विद्यार्थ्यांमध्ये उद्योग जनजागृती व्हावी व त्या माध्यमातून नवे उद्योजक निर्माण व्हावे, याबाबत नुकताच करार करण्यात आला.

करारांतर्गत जिल्हा एमसीईडी औरंगाबादमार्फत उद्योजकता प्रशिक्षण, उद्योजकता जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, जाहिरात व विक्री कला, यशस्वी उद्योजकांचे अनुभव व त्यांच्या संबंधित उद्योग प्रकल्पांना भेटी, उद्योग निवडीचे तंत्र, बाजारपेठ सर्वेक्षण व विश्लेषण, सूक्ष्म, मध्यम लघुउद्योग मंत्रालयाच्या योजना, पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना, माहिती विद्यार्थ्यांना वेळोवेळी कार्यक्रम आयोजित करून देण्यात येणार आहे. या कराराप्रसंगी शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एम.व्ही. इंगळे, एमसीईडीमार्फत आनंद विद्यासागर, प्रा. डॉ. आशिष विखार, प्रा. के. पी. अकोले हे उपस्थित होते.

लोकमत

# जळगाव तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांत 'प्लेसमेंट'

### १२५ पेक्षा अधिक जणांचा समावेश, प्रशिक्षणाचा फायदा



लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील अंतिम वर्षाच्या १२५ पेक्षा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये देशातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळाले आहे.

यावर्षी विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी दहा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट देऊन, ऑनलाइन पद्धतीने त्यांची प्री-प्लेसमेंट चाचणी परीक्षा घेतली होती. त्यात उत्तीर्ण झालेल्यांच्या मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या कंपन्यांमध्ये वाहन निर्मिती, बांधकाम, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आदी क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश आहे.

महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना देशातील चांगल्या औद्योगिक आस्थापनांमध्ये नोकरीच्या उत्तम संधी मिळाव्यात म्हणून प्लेसमेंट पूर्व प्रशिक्षणांचे आयोजन तज्ज्ञांमार्फत केले जाते. संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास निर्माण करणे, तांत्रिक विषयातील स्किल्स डेव्हलपमेंट, रेझ्युमे तयार करणे आदींवर माहिती दिली जाते. त्यामुळे जळगावच्या शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळण्यासाठी फायदा होतो, असे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर डॉ. आशिष विखार यांनी सांगितले. प्लेसमेंट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. पराग पाटील, प्राध्यापक, कर्मचारी यांनी कौतुक केले.

Jalgaon Main
Page No. 2 Jul 22, 2023
Powered by: erelego.com

# शासकीय तंत्रनिकेतन येथे परिसर मुलाखती सुरू

प्रतिनिधी | जळगाव

शासकीय तंत्रनिकेतन येथे गुरुवारपासून कॅम्पस इंटरव्ह्युंना सुरूवात झाली आहे. मॅकेनिकल, इलेक्ट्रीकल व ई-अ‍ॅण्ड टीसी या तीन विभागातील १५० विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. हिताची, व्हर्लपूल व ग्रीव्हज् कॉटन या तीन मोठ्या कंपन्यांचे अधिकारी मुलाखती घेत आहेत. शुक्रवारी मुलाखती संपल्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे महाविद्यालयांना कळवण्यात येणार आहेत. प्लेसमेंट ऑफीसर आशिष विखार या उपक्रमांतर्गत समन्वयाची भूमिका निभावत आहेत.

## YEAR 2021-22

जळगांव लोकशाही ०८ जुलै २०२१

# शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव मध्ये सुप्रसिद्ध ''गोदरेज'' कंपनी मार्फत चाचणी परीक्षा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव मध्ये देशातील सुप्रसिद्ध कंपनी 'गोदरेज' ह्या भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी मार्फत नोकरी साठी यंत्र अभियांत्रिकी च्या ६७ विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पद्धतीने चाचणी परीक्षा घेण्यात आली.

चाचणी परीक्षेत सामान्य योग्यता, सामान्य ज्ञान, यांत्रिकी अभियांत्रिकी, दिलेल्या विषयावर इंग्लिश मधून निबंध लेखन करणे असे विविध प्रश्न विचारण्यात आलेत.

सदर परीक्षेसाठी गोदरेज कंपनीतील मानव संसाधन विभागातील अधिकारी श्री अंशुमन पांडा व संस्थेमार्फत प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी डॉ आशिष विखार ह्यानी परिश्रम घेतले तर प्राचार्य डॉ एस बी वेस्ली ह्यानी मार्गदर्शन केले.

LOKSHAHI Main Edition
Jul 8, 2021 Page No. 1
Powered by : eReleGo.com

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2022-02-15 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

# शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयात १०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी मुलाखती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १४ फेब्रुवारी**

येथील शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच सेवासंवर्धन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्ष अभियांत्रिकी पदविका आणि पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यासाठी मेगा परिसर मुलाखतीचे (कॅम्पस प्लेसमेंट) आयोजन करण्यात आले.

ही प्लेसमेंट औरंगाबाद येथील धूत ट्रान्स्मिशन ह्या बहुराष्ट्रीय कंपनीत होईल. धूत ट्रान्स्मिशन ही टू व्हीलर, थ्री व्हीलर व फोर व्हीलरच्या वायर हार्नेसिंगचे उत्पादन बनविणारी जगातील तिसऱ्या क्रमांकाची कंपनी आहे. मुलाखतीसाठी कंपनीतील मानव संसाधन विभागातील व्यवस्थापक शुभम पाटील, वृषभ आवळे उपस्थित होते. त्यांनी कंपनीचे उत्पादन, उत्पादन प्रक्रिया, मशीन्स




व कामे करण्याच्या पद्धतीवद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांचे स्वागत अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. मोहनी ह्यांनी केले. तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. पराग पाटील ह्यांनी कॅम्पस प्लेसमेंटकरिता मार्गदर्शन केले. ह्यावेळी सेवासंवर्धन संस्थेचे संचालक हेमंत भिडे आणि प्रतीक चौधरी उपस्थित होते.

मेगा भरती कार्यक्रमास जळगावचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि शासकीय तंत्रनिकेतन, शासकीय तंत्रनिकेतन नंदुरबार, केसीई तंत्रनिकेतन, एसएसबीटी, बांभोरी, गोदावरी फौंडेशनचे तंत्रनिकेतन आदींसह जळगावच्या सुमारे १०० वर विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. या आयोजनासाठी शासकीय तंत्रनिकेतनचे प्रशिक्षण आणि अस्थापना अधिकारी डॉ. आशिष विखार, प्रा. जय पंडित तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रशिक्षण व अस्थापना अधिकारी महेश सदावर्ते ह्यांनी परिश्रम घेतले.

Powered by iDocuments

divyamarathi.com
17, Feb | Jalgaon City
दै.दिव्य मराठी

# शासकीय अभियांत्रिकीत परिसर मुलाखतीत शंभर विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रतिनिधी** | जळगाव

शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच सेवासंवर्धन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्ष अभियांत्रिकी पदविका व पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी मेगा परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी औरंगाबाद येथील धूत ट्रान्समिशन या बहुराष्ट्रीय कंपनीला आमंत्रण देण्यात आले होते. कंपनीतील मानव संसाधन विभागातील व्यवस्थापक शुभम पाटील, वृषभ आवळे यांनी महाविद्यालयास भेट दिली. या वेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. मोहनी, प्राचार्य डॉ.पराग पाटील, संचालक हेमंत भिडे व प्रतीक चौधरी उपस्थित होते. मुलाखतीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्याल जळगाव, शासकीय तंत्रनिकेतन जळगाव, शासकीय तंत्रनिकेतन नंदुरबार, केसीई तंत्रनिकेतन, एसएसबीटी, गोदावरी तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. आयोजन डॉ

लोकशाही

## थोडक्यात

### शासकीय तंत्रनिकेतन जळगांवच्या

# ३२ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीद्वारे निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
जळगांव प्रतिनिधी

ऑनलाईन परिसर मुलाखती द्वारे येथील शासकीय तंत्रनिकेतन, जळगांवच्या ३२ विद्यार्थ्यांची पुण्यातील दोन नामवंत कंपन्यांमध्ये नुकतीच नोकरी करीत निवड झाली आहे. त्यात इलेक्ट्रॉनिक्स च्या ०९, इलेक्ट्रिकाल चे ०३ तर मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या २० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ऑनलाईन पद्धतीने दोन टप्प्यात सदर मुलाखती झाल्या त्यात पहिल्या टप्प्यात तांत्रिक तर दुसऱ्या टप्प्यात वयक्तिक प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आलेत. मुलाखतीच्या आयोजनासाठी प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी डॉ आशिष विखार ह्यानी परिश्रम घेतले तर प्राचार्य डॉ एस बी वेस्ली ह्यानी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे निवडी बद्दल सर्व प्राध्यापक व कर्मचारी ह्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

LOKSHAHI Main Edition
Jun 15, 2021 Page No. 1
Powered by : eReleGo.com

दै. तरुण भारत, जळगांव १० जून २०२१

# शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची फिलिप्स इनोव्हेशन मध्ये निवड

**जळगाव :** येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील अंतिम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स ॲंड टेलिकम्युनिकेशन शाखेचे विद्यार्थी गौरव अटकल व आकांक्षा खैरनार यांची इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील प्रख्यात संस्था फिलिप्स इनोव्हेशन मध्ये निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांचे दोन राउंड मध्ये ऑनलाईन पद्धतीने इंटरव्ह्यू झालेत. त्यात पहिला तांत्रिक आणि दुसरा वैयक्तिक इंटरव्ह्यू झाला. महाराष्ट्रातील काही ठरावीक तंत्रनिकेतनचे विद्यार्थी या संस्थेद्वारे निवडण्यात आले. त्यात शासकीय तंत्रनिकेन, जळगांवच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या उपक्रमकरिता प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी डॉ. आशिष विखार, प्रा. उंबरकर यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विभागप्रमुख के. पी. अकोले व प्राचार्य डॉ. एस. बी. वेस्ली यांनी अभिनंदन केले .


आकांक्षा खैरनार


गौरव अटकल